
# कांगारु माता काळजी ह्या पदधतीच्या मदतीने अशक्त बाळाची काळजी कशी घ्याल?

## विषय MN3







# समीक्षा १

कार्ड दाखवा आणि सर्वांना सांगा, आज पुन्हा आपण अशक्त बाळाची काळजी कशी घ्यावी यावर चर्चा करणार आहोत.

विचारा की, मागील काही महिन्यांत तुम्ही नवजात बाळाच्या जन्मानंतर लगेच गृहभेट दिली आहे का ?
तुम्ही कसे ओळखलत कि नवजात बालक हे अशक्त आहे ?

डाव्या बाजुला दिले माहितीचा उपयोग करा व चर्चेला सुरूवात करा व योग्य उत्तरा पर्यंत पोहचा.

सहभागी एल.एम.पी चा उपयोग करुन जाणून घ्या कि नवजात बालक वेळेवर जन्माला आला आहे कि नाही.

जन्माच्या वेळी खालील तीन परिस्थितीचे सहाय्यतेने आपण जाणून घेवू शकतो कि बाळ अशक्त आहे किंवा नाही:

१. जन्माच्या वेळी बाळाचे वजन २ किलोग्रॅम किंवा त्यापेक्षा कमी आहे का ?
२. बाळाचा जन्म साडे आठ महिन्यांच्या अगोदर झाला आहे काय ?
३. बाळ योग्य प्रकारे स्तनपान करत आहे काय ?

वरिल तीन प्रश्नांपैकी एकाचेही उत्तर हो असेल तर समजून घ्या कि नवजात बालक हे अशक्त आहे. अशा बालकांना जिवंत ठेवण्याकरिता विशेष देखभालीची आवश्यकता असते. वेळोवेळी स्तनपान, जास्तीत जास्त स्वच्छता या सोबतच खास करुन बाळाला वेगळया ऊबेचीही आवश्यकता असते.



## समीक्षा १



कसे जाणून घ्याल कि नवजात बालक हे अशक्त आहे ?




अशक्त नवजात बाळाला कोणत्या विशेष देखभालीची आवश्यकता असते ?



# चर्चेचे प्रश्न

कार्ड दाखवा आणि सर्वांना प्रश्न वाचावयास द्या आणि प्रत्येकि कार्यकर्त्यांला एक–एक करुन विचारा.

प्रत्येक प्रश्नांवर चर्चा करा व कार्यकर्त्यांना आपले मत मांडण्याची संधी द्या.

ग्रामीण भागात अशक्त नवजात बालकाला योग्य ती ऊब मिळण्याकरिता काही विशेष पध्दती आहेत का ? किंवा अशी कोणती पारंपारिक पध्दती आहे काय ?

थंडिच्या वेळी अशा बालकांना ऊबे करिता कोण कोणते उपाय केले जातात.

तुम्ही कधी बाळाला ऊब देण्याच्या पध्दतीत बाळाच्या घरच्यांची मदत केली आहे का ?

तुम्ही हे जाणता का कि हया पदधतीला कांगारु माता देखभाल हे ही नाव आहे ?



# चर्चेचे प्रश्न



- ग्रामीण भागात अशक्त नवजात बालकांना योग्य ती ऊब मिळण्याकरिता काही विशेष पध्दती आहेत का ? किंवा अशी कोणती पारंपारिक पध्दती आहे काय ?

- थंडिच्या वेळी अशा बालकांना ऊबे करिता कोण कोणते उपाय केले जातात.

- तुम्ही कधी बाळाला ऊब देण्याच्या पध्दतीत बाळाच्या घरच्यांची मदत केली आहे का ?

- तुम्ही हे जाणता का कि हया पदधतीला कांगारु माता देखभाल हे ही नाव आहे ?









# कांगारू माता देखभाल हा शब्द कसा तयार झाला ?

डाव्या बाजूला दिलेल्या माहितीचा उपयोग करुन कार्यकर्त्यांना कांगारु माता देखभाल हया विषयी सांगा.

आता पुढील कार्डावर जा.

- कांगारु हा असा प्राणी आहे की ज्याच्या पिल्लांचा जन्म हा वेळे अगोदर होत असतो. मानवी बालकांप्रमाणे त्याच्या पिल्लांना हि जन्माकरिता ८ महिने लागतात. परंतु हया पिल्लांचा जन्म एका महिन्यातच होत असतो. हे एक महिन्याचे पिल्लू अंध, बिना केसांचे तसेच जेमतेम सेंटिमिटरचे (एका बोटा एवढे) असते. त्याचेही सर्व अवयव विकसित झालेले नसतात. त्यामुळे ते जन्मताच बाहेरिल परिसरात जिवंत राहू शकत नाही. जन्मत:च त्याची माता त्याला आपल्या पोटाच्या पिशवीत ठेवते. हि पिशवी मातेच्या पोटाच्या वरिल भागावर असते. पिशवीत पिल्लांना ऊब मिळते व ते आरामात स्तनपानही करू शकतात. सहा महिन्यांनंतर पिल्ले आपल्या मातेच्या पिशवीतून डोके बाहेर काढून पाहण्यास सुरूवात करतात व आठ महिन्यांनंतर ती मातेच्या पिशवीतून सुरक्षितपणे बाहेर निघतात.

- याप्रकारे आपल्या त्वचेच्या संपर्कात ठेवून तसेच हळू हळू स्तनपान करवून मातेने आपल्या अशक्त बालकाची विशेष काळजी घेतली पाहिजे.




# कांगारू माता देखभाल हा शब्द कसा तयार झाला ?



- तुम्ही असा प्राणी कधी पाहिला आहे काय ?

- तुम्ही हया प्राण्याबद्दल कधी ऐकले आहे काय ?

- त्याचे नाव काय आहे ?







# सर्व नवजात अशक्त बालकांना कांगारु माता केअर ची गरज असते का?

कार्ड दाखवा आणि सहभाग्यांना सर्व बिंदुचे वाचन करण्यास सांगा.



डाव्या बाजुला लिहिलेल्या माहितीचा उपयोग करुन चर्चेला सुरूवात करा.

सर्व नवजात बालकांना कांगारु मदर केअरचा फायदा होत असतो का, लक्षात ठेवा:

१. जी बालके साडे ८ महिन्यांच्या आधी जन्माला येतात.
२. ज्या बालकांचे वजन २ किलोग्रॅमपेक्षा कमी असते.
३. जी बालके जन्मत:च स्तनपान करण्यात अशक्त असतात.

सर्व बालकांना ऊबेची गरज असते. परंतु जास्त अशक्त बालकांना फक्त कांगारु मदर केअर ने काही फायदा होत नाही.

बहुतांशा जास्त अशक्त बालकांना जे बिलकुल दुध पित नाहीत, दवाखान्यात पाठविले पाहिजे कारण अशा प्रकारच्या बालकांची देखभाल घरच्या घरी केली जावू शकत नाही. जास्त अशक्त बालकांना दवाखान्यात डॉक्टरांच्या निगराणी खाली ठेवण्याची आवश्यकता असते.





# सर्व नवजात अशक्त बालकांना कांगारु माता केअरची गरज असते का ?

प्रत्येकी अशक्त बालकांना कांगारु मदर केअर ने फायदा होवू शकतो:



१. जी बालके साडे ८ महिन्यांच्या आधी जन्माला येतात.



२. ज्या बालकांचे वजन २ किलोग्रॅमपेक्षा कमी असते.



३. जी बालके जन्मत:च स्तनपान करण्यात अशक्त असतात.





# कांगारु मदर केअर कशा प्रकारे केली पाहिजे?

कार्ड दाखवा आणि सर्व कार्यकर्त्यांना डाव्याबाजूला दिलेल्या माहितीचा उपयोग करुन कांगारु मदर केअर हया पध्दतीच्या वापराबद्दल सविस्तर सांगा.

चर्चा करा, कारण आपण अशा पध्दतीचा वापर प्रथमच करित आहोत यामुळे हि पध्दत अतिशय व्यवस्थितरित्या समजविणे आवश्यक आहे. त्यांना हे ही समजूवन सांगा कि जर तुम्ही हया करिता कुटुंबातील सदस्यांची मदत घेतली तर कशाप्रकारे अनेक बालकांचा जीव वाचू शकतो.

चर्चेच्या शेवटी सर्वांना एकत्रितपणे पुन्हा एकदा विचारा कि त्यांना सर्वांना समजले आहे का. खात्री करुन घ्या कि कांगारु मदर केअर पध्दतीबद्दल सर्वांना व्यवस्थित सर्व काही समजले आहे ना.

चर्चा संपल्यानंतर त्याच गावातील एखादया बालकाला अथवा एखादया खेळण्यातील बाहलीचा वापर करून सर्वांना कांगारु मदर केअरच्या मुख्य मुद्द्यांना पुन्हा एकदा सांगून त्यांना प्रयोग करुन दाखवा.

कांगारु मदर केअर मुख्य भाग - या मुद्द्यांवर विषेश लक्ष द्या.

- बालकाला कपडे न घालता आपल्या शरिराचा स्पर्शात ठेवणे.
- त्याला टोपी व मोजे घालणे.
- त्याला मातेच्या शरिराला व्यवस्थित बांधून अथवा टांगून ठेवणे.
- बाळाला अशा परिस्थित ठेवा, जेणे करुन त्याला श्वास तसेच स्तनपान व्यवस्थित करता येईल.
- हा प्रयोग कोणत्याही पध्दतीने अवलंबविता येतो - उभ्याने, झोपून, काम करताना इत्यादी.
- मातेशिवाय कुटुंबातील इतर कोणताही सदस्य कांगारु पद्धतीने अशक्त बालकांची देखभाल करु शकतात. असे करणे जरुरी आहे, जेणेकरुन मातेलाही आराम भेटेल.

- **देखभाल** - जे बालक कांगारु मदर केअर या पद्धतीमध्ये आहे त्याला वारंवार देखरेखीची आवश्यकता असते. माता तसेच कुटूंबातील सर्व सदस्यांनी विशेष लक्ष दिले पाहिजे कि बाळाची मान सरळ आहे का, तसेच त्याची श्वसन प्रक्रिया व्यवस्थितरित्या आहे का
- **आहार** - बालक मातेच्या स्तनाजवळ असल्याने दुध व्यवस्थितरित्या व भरपूर प्रमाणात येते. बाळाची अवस्था पाहून बाळाला मातेच्या स्तनातील दूध काढून चमच्याने ही पाजू शकतात.
- **शी-सू** - हया वयातील बालके दिवसातून अनेकदा लंगोट ओला अथवा खराब करतात. ह्यामुळे घरातील जुणे सुती कपड्यांचा वापर करुन त्याचे लंगोट करणे व त्याचा वेळोवेळी उपयोग करणे.
- **मातेला आपली मदत** - माता कांगारु मदर केअर देता देता आपली दररोची कामे हि करु शकतात. केवळ ही सर्व कामे ती एकटी करु शकणार नाही. कुटंबातील सर्व सदस्यांनी तिला वेळोवेळी मदत केली पाहिजे. कुटुंबातील कोणताही सदस्य कांगारू मदर केअर ने बालकांची काळजी घेवू शकतो. त्याच बरोबर मातेला घरातील इतर कामांमध्ये ही मदत केली पाहिजे. तसे केले नाही तर अशक्त बालकांना वाचविणे कठिण होते.



# कांगारु मदर केअर कशा प्रकारे केली पाहिजे ?





- बालकांला कपडे न घालता आपल्या शरिराचा स्पर्शात ठेवले पाहिजे.
- त्याला मातेच्या शरिराला व्यवस्थित बांधून अथवा टांगून ठेवले पाहिजे.
- बाळाला अशा परिस्थितील व्यवस्थित ठेवले पाहिजे, त्यात बाळाला श्वास घेण्यास काही त्रास होत नाहीये ना तसेच, स्तनपान प्रक्रियेत काही त्रास होत नाहीये ना.
- त्याला टोपी व मौजे घालावेत.







# कांगारु मदर केअर ने अशक्त बाळाला काय फायदे होतात?

कार्यकर्त्यांना कांगारु मदर केअर ने बाळाला होणारे फायदे डावीकडे दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करुन समजवा.

कांगारु मदर केअर ने अशक्त बाळाला बरे होण्यात खुप मदत होते, जसे की:

**ऊब** : अशक्त नवजात बालकांच्या शरिरातील ऊब लवकर कमी होते, त्यामुळे त्याच्या मृत्यूची संभावना अधिक असते. परंतु कांगारु मदर केअरच्या मदतीने मातेच्या शरिरातील ऊबेमुळे बाळाच्या शरिरातील तापमान योग्य ठेवण्यात मदत होते.

**संक्रमणापासून बचाव** : कांगारु मदर केअर ने बालकाचे बाहेरच्या संक्रमाणापासून संरक्षण होते.

**योग्य प्रकारे स्तनपानास मदत** : बाळ मातेच्या स्तनाजवळ असल्याने मातेच्या दूधाच्या प्रमाणात वाढ होते.


**बाळाला काही त्रास होत असल्यास त्याची लगेच जाणीव** : कांगारू मदर केअर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिचे बाळाकडे लक्ष राहते. त्यामुळे बाळाला काही त्रास होत असल्यास त्याची जाणीव लगेच होते.




# कांगारु मदर केअर ने अशक्त बाळाला काय फायदा होतो ?



- ऊब मिळते.
- संक्रमणापासून बचाव होतो.
- वारंवार स्तनपान करविण्यात सुविधा होते.
- बाळाला काही त्रास होत असल्यास त्याची जाणीव लगेच होते.













# बाळाला किती वेळेपर्यंत कांगारु मदर केअर दिली पाहिजे ?

कार्ड दाखवा आणि सहकार्यकर्त्यांना सर्व बिंदुचे वाचन करण्यास सांगा.

डावीकडे दिलेल्या माहितीचा उपयोग करुन चर्चेला पुढे न्या.

**बाळाला कांगारु मदर केअर तो पर्यंत दया:**

- जोपर्यंत बाळाला आत मध्ये रहावयास वाटेल.
- जोपर्यंत बाळ योग्य प्रकारे स्तनपान करत नाही.
- जोपर्यंत बाळाचे वजन २.५ किलोग्रॅम होत नाही.
- जोपर्यंत बाळ १ महिन्याचे होत नाही.

जास्तीत जास्त काळापर्यंत कांगारु मदर केअरचा प्रयोग करा. जोपर्यंत अशक्त नवजात बालक योग्यप्रकारे स्वत:हून स्तनपान करण्यास सुरुवात करत नाही आणि त्याचे वजन योग्य प्रमाणात वाढत नाही, तोपर्यंत बाळाला कांगारु मदर केअरची आवश्यकता असते.





# बाळाला किती वेळेपर्यंत कांगारु मदर केअर दिली पाहिजे ?

- जोपर्यंत बाळाला आतमध्ये रहावयास वाटेल.
- जोपर्यंत बाळ योग्य प्रकारे स्तनपान करत नाही.
- जोपर्यंत बाळाचे वजन २.५ किलोग्रॅम होत नाही.
- जोपर्यंत बाळ १ महिन्याचे होत नाही.












## लक्षात ठेवा :

कार्ड दाखवा आणि प्रत्येकी सहभाग्याला एका-एका बिंदुचे वाचन करण्यास सांगा तसेच सगळयांची सहमती घ्या.


चर्चा करा की कांगारु मदर केअर ने मातेला कोणत्याप्रकारचा त्रास होवू शकतो. चर्चा सुरु असताना मातेला होणाऱ्या त्रासाचे योग्य उपाय सगळयांच्या मदतीने काढा.





## लक्षात ठेवा :

गावाकडे ३-४ महिन्यांत कमीत कमी एक अशक्त बालक असतेच.



अशक्त बाळाच्या घरी जेव्हा-जेव्हा गृहभेट देणार तेव्हा कुटूंबातील सदस्यांना कांगारु मदर केअरबद्दल माहिती देणे.







# कामाची योजना :

कार्ड दाखवा.

कार्यकर्त्यांना सर्व बिंदुचे एक-एक करुन वाचन करण्यास सांगा.

डावीकडे दिलेल्या बिंदुचा वापर करुन चर्चेचे सारांश प्रस्तुत करा.

कार्यकर्त्यांना विचारा कि, ते ह्या सर्व गोष्टींशी सहमत आहेत का.

- आता पासून आम्ही आमच्या क्षेत्रातील एकही अशक्त बालकाला आमच्या माहितीतून वगळणार नाही.
- आम्ही सर्व अशक्त बालकांच्या घरी तोपर्यंत गृहभेट देणार जोपर्यंत तो बरा होत नाही.
- आम्ही सर्व अशक्त बालकांना कांगारु मदर केअर दिली जाते आहे काय याची खात्री करुन घेवू.



# कामाची योजना :



**यापुढे अशक्त बाळाला वाचविण्याच्या प्रक्रियेत आपण काय करणार.**

- आता पासून आम्ही आमच्या क्षेत्रातील एकही अशक्त बालकाला आमच्या माहितीतून वगळणार नाही.
- आम्ही सर्व अशक्त बालकांच्या घरी तोपर्यंत गृहभेट देणार जोपर्यंत तो बरा होत नाही.
- आम्ही सर्व अशक्त बालकांना कांगारु मदर केअर दिली जाते आहे काय याची खात्री करुन घेवू.

